महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय सोलापूर ग्रामीण
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर
दुरध्वनी क्रमांक:- ०२१७-२७३२००१.
EmailID sp.solapur.r@mahapolice.gov.in

क्रमांक:- .आस्था-1/पो.शि.भरती-2021/नियुक्ती/ईबी- 4522/2023 सोलापूर ग्रा. दिनांक -२५/०५/२०२३

**संदर्भ** :- 01) मा.पोलीस महासंचालक,प्रशिक्षण व खास पथके,म.रा.मुंबई यांचेकडील पत्र क्र.प्रशि/पो.शि.भरती/प्रक्रिया-2021/188/2382/2021, दि.04/11/2022

02) या कार्यालयाकडुन दि.06/11/2022 रोजी दैनिक लोकमत, दैनिक संचार व साप्ताहिक शौर्य या वृत्तपत्रात दिलेली जाहिरात.

03) मा.पोलीस महासंचालक,प्रशिक्षण व खास पथके,म.रा.मुंबई यांचेकडील पत्र क्र.प्रशि/पो.शि.भरती/रिक्त पदे माहिती/132/3690/2020, दि.06/12/2022

**विषय** :- **पोलीस शिपाई भरती - 2021**
**पोलीस शिपाई या पदावर नियुक्तीबाबत..**

----0000----

**आदेश** :-

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम 2011 व शासन पत्र गृहविभाग क्रमांक आरसीटी-0312/प्र.क्र.228/पुनर्बांधणी-166/पोल-5अ, दिनांक 07/01/2016 अन्वये व संदर्भाधिन पत्रात नमुद प्रमाणे दिनांक 06/01/2023 रोजी पासुन पोलीस अधीक्षक,सोलापुर ग्रामीण आस्थापनेवरील पोलीस शिपाई पदाची सरळ सेवा भरती आयोजित करण्यात आली होती. खालील उमेदवारांना जिल्हा शल्यचिकीत्सक, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,सोलापुर यांनी **"पोलीस शिपाई"** या पदासाठी वैद्यकिय दृष्टया पात्र असल्याचे घोषित केल्यामुळे व खालील नमुद उमेदवार हे राहत असलेल्या घटकाकडुन चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त झाले असुन त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे आक्षेपार्ह नोंदी आढळुन येत नसलेबाबत कळविल्याने महाराष्ट्र शासन, गृह विभाग,मुंबई यांचे कडील आदेश क्र. आरसीटी-0311/प्र.क्र.228/पोल-5अ, दिनांक 16 जुन, 2011 मधील तरतुदींनुसार त्यांना **"पोलीस शिपाई"** अस्थायी या पदावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येत आहे. त्यांना सातव्या वेतन आयोगाचे वेतन स्तर S-7, रु.21700-69100/- व देय असणारे इतर भत्ते त्यांना कर्तव्यास रुजु झाले दिनांकापासून अनुज्ञेय होतील. खालील उमेदवारांनी राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, सोलापूर ग्रामीण यांचेकडे त्वरित रुजु व्हावे.

| अ.क्र. | चेस्ट क्रमांक | उमेदवाराचे नांव व पत्ता | जन्म दिनांक | जात | निवड प्रवर्ग | सुरुवातीचे वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | 1782 | श्री.सचिन भारत पवार, रा.मु.गोलेगांव,पो.आष्टा, ता.भुम, जि.उस्मानाबाद | 02/01/2000 | पारधी | अ.ज. सर्वसाधारण | रु.21700/- विशेष वेतन रु.750/- |
| 02 | 1686 | श्री.ज्ञानेश्वर बाबुराव खुडे, रा.मु.नाव्हा,पो.तळेगाव, ता.हादगाव. जि.नांदेड | 14/10/2000 | आंध | अ.ज. सर्वसाधारण | रु.21700/- विशेष वेतन रु.750/- |

| अ.क्र. | चेस्ट क्रमांक | उमेदवाराचे नांव व पत्ता | जन्म दिनांक | जात | निवड प्रवर्ग | सुरुवातीचे वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| 03 | 1626 | श्री.बालाजी बबन घंदारे, रा.दरेगाव,ता.औढा (नागनाथ) जि.हिंगोली | 14/08/1996 | आंध | अ.ज. सर्वसाधारण | रु.21700/- विशेष वेतन रु.750/- |
| 04 | 1820 | श्री.चंद्रकांत चिंतामण चौधरी, रा.मु.कोकणगाव खुर्द, पो.देवठाण, ता.दिंडोरी, जि.नाशिक | 20/06/1993 | कोकणा | अ.ज. सर्वसाधारण | रु.21700/- विशेष वेतन रु.750/- |
| 05 | 1422 | श्री.माधव आनंदराव लोखंडे रा.मु.धक्याचीवाडी,पो.जांभळा ता.हदगाव, जि.नांदेड | 13/10/1995 | आंध | अ.ज. सर्वसाधारण | रु.21700/- विशेष वेतन रु.750/- |
| 06 | 1500 | श्री.कृष्णा हनवता धनवे, रा.खरबी,ता.हदगाव, जि.नांदेड | 18/06/1997 | आंध | अ.ज. सर्वसाधारण | रु.21700/- विशेष वेतन रु.750/- |
| 07 | 1850 | श्री.रविदास दहऱ्या गावीत, रा.मु.धनबर्डी,पो.नागझरी, ता.नवापुर,जि.नंदुरबार | 05/05/1992 | मावची | अ.ज. सर्वसाधारण | रु.21700/- विशेष वेतन रु.750/- |
| 08 | 1662 | श्री.आमीन रब्बानी तडवी, रा.मु.पो.पाल,ता.रावेर, जि.जळगाव | 11/02/1999 | तडवी भिल | अ.ज. सर्वसाधारण | रु.21700/- विशेष वेतन रु.750/- |
| 09 | 1852 | श्री.अनिल बापु बागुल, रा.मु.पो.आलियाबाद, ता.बागलान, जि.नाशिक | 20/11/1993 | कोकणा | अ.ज. सर्वसाधारण | रु.21700/- विशेष वेतन रु.750/- |
| 10 | 1880 | श्री.केशव बापु चव्हाण, रा.मु.पो.नेर (नुरनगर) ता.जि.धुळे | 01/07/1994 | पारधी | अ.ज. सर्वसाधारण | रु.21700/- विशेष वेतन रु.750/- |
| 11 | 1886 | श्री.रघुनाथ ग्यानदेव धनवे, रा.मु.भोसी,पो.लोहगाव, ता.औढा (नागनाथ) जि.हिंगोली | 09/03/1992 | आंध | अ.ज. सर्वसाधारण | रु.21700/- विशेष वेतन रु.750/- |
| 12 | 1645 | श्री.राहुल चांगदेव काळे, रा.मु.पो.मार्डी, ता.उत्तर सोलापुर, जि.सोलापुर | 21/01/1996 | पारधी | अ.ज. होमगार्ड समांतर आरक्षण | रु.21700/- विशेष वेतन रु.750/- |
| 13 | 1706 | श्री.नागोराव शिवाजी बोंबले, रा.भुरक्याची वाडी, ता.कळमनुरी,जि.हिंगोली | 22/10/1997 | आंध | अ.ज. सर्वसाधारण | रु.21700/- विशेष वेतन रु.750/- |
| 14 | 2171 | श्रीमती वर्षा उत्तमराव मुकाडे रा.मु.बोथी,पो.बउर, ता.कळमनुरी, जि.हिंगोली | 15/05/2001 | आंध | अ.ज. महिला समांतर आरक्षण | रु.21700/- विशेष वेतन रु.750/- |
| 15 | 2123 | श्रीमती प्रियंका शिवराम काटेला, रा.वाणगाव डेहणे,(पाटील पाडा) ता.डहाणू , जि.पालघर | 05/04/2002 | वारली | अ.ज. महिला समांतर आरक्षण | रु.21700/- विशेष वेतन रु.750/- |

| अ.क्र. | चेस्ट क्रमांक | उमेदवाराचे नांव व पत्ता | जन्म दिनांक | जात | निवड प्रवर्ग | सुरुवातीचे वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| 16 | 2269 | श्रीमती उषा गोरखनाथ पवार, रा.सी.पी.ऑफिस ब्लॉक -A , विंग B, रुम नं.502, मिल कॉर्नर औरंगाबाद | 06/02/1996 | भिल | अ.ज. महिला समांतर आरक्षण | रु.21700/- विशेष वेतन रु.750/- |
| 17 | 2290 | श्रीमती अंजली रामचंद्र खानापुरे रा.मु.पो.तरटगांव, ता.मोहोळ, जि.सोलापुर | 02/06/2003 | कोळी महादेव | अ.ज. महिला समांतर आरक्षण | रु.21700/- विशेष वेतन रु.750/- |
| 18 | 2166 | श्रीमती सारिका किसन किरवे, रा.मु.पो.शेंडी,ता.अकोले, जि.अहमदनगर | 12/06/1998 | कोळी महादेव | अ.ज. महिला समांतर आरक्षण | रु.21700/- विशेष वेतन रु.750/- |
| 19 | 2154 | श्रीमती ललिता पुंडलिक राऊत, रा.निगडोळ,ता.दिंडोरी, जि.नाशिक | 10/10/1998 | कोकणा | अ.ज. महिला समांतर आरक्षण | रु.21700/- विशेष वेतन रु.750/- |
| 20 | 2248 | श्रीमती सुरेखा गंगाधर गवळी, रा.बोरदैवत,ता.कळवण, जि.नाशिक | 29/07/1999 | कोकणा | अ.ज. महिला समांतर आरक्षण | रु.21700/- विशेष वेतन रु.750/- |
| 21 | 2285 | श्रीमती मनिषा रामसिंग पडवाळ, रा.मु.कुऱ्हा,पो.कोऱ्हाळा, ता.मोताळा, जि.बुलढाणा | 20/04/1996 | नायकडा | अ.ज. महिला समांतर आरक्षण | रु.21700/- विशेष वेतन रु.750/- |
| 22 | 1263 | श्री.अजीम मोहम्मद सलीम मोहम्मद, रा.कारंजा रोड, खंदक गल्ली, बीड, जि.बीड | 25/09/1999 | सोनझरी झरेका | अ.ज. पोलीस पाल्य समांतर आरक्षण | रु.21700/- विशेष वेतन रु.750/- |

2. वरील उमेदवारांची तात्पुरती नियुक्ती ही खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यात आली आहे.

- वरील नमुद उमेदवारांच्या नियुक्त्या चारित्र्य व वर्तणुकीची पडताळणी, जातीचे दाखले, शैक्षणिक दाखले, प्रकल्पग्रस्त दाखला व भरुन दिलेल्या साक्षांकन नमुना पडताळणीच्या अधिन राहुन करण्यात आली आहे. सेवेत नियुक्त झाल्यानंतर पून्हा अशा कोणत्याही घटना निष्पन्न झाल्यास वा साक्षांकन नमुन्यामध्ये दिलेली माहिती ही खोट्या स्वरुपाची, वा मुद्दाम म्हणून दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास व गुन्हयामध्ये शिक्षा वा दंड झाल्याचे निदर्शनास आल्यास तुम्हांस सेवेतून कमी करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

- महाराष्ट्र शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-2011 प्र.क्र.1064/2011/16-ब, दिनांक 12 डिसेंबर 2011 अन्वये, नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहिल. उमेदवाराने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोचपावतीची साक्षांकित प्रत या कार्यालयास सादर करावी. जातपडळणीमध्ये

जातीचे प्रमाणपत्र हे अवैध ठरल्यास त्यांना सेवेतून कमी करण्यात येईल तसेच महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, 2000 यातील तरतुदीनुसार त्वरीत कारवाई करण्यांत येईल याची नोंद घ्यावी जात वैधता प्रमाणपत्र मिळण्या संबंधी योग्य तो पाठपुरावा करावा.

- तुम्हांस देण्यात आलेली नियुक्ती ही तात्पुरती व हंगामी स्वरुपाची असून तुम्हांस कोणत्याही प्रकारची नोटीस अथवा पुर्वसुचना न देता सेवेतून कमी करण्यात येईल.

- तुम्ही " पोलीस शिपाई " या पदाचा प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षात राजीनामा दिल्यास व पदावरुन कार्यमुक्त करण्याची विनंती केल्यास प्रशिक्षणावरील झालेला खर्च व प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्यासहित रक्कम आगावु शासनास जमा करावी लागेल, त्यानंतर आपणास सेवेत पुर्ननियुक्ती बाबतचा कोणताही हक्क रहाणार नाही अथवा त्याबाबतचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. सक्षम प्राधिका-यासमोर आपण त्या बाबतचे रु. 100/- चे मुद्रांक वरचे हमीपत्र शासनास / या कार्यालयास लिहुन दिलेले आहे.

- वरील नमुद उमेदवारांना नियुक्ती नंतर महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अंनियो 1005/126/सेवा-4., दिनांक 31/10/2005 मध्ये नमुद नुसार परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु होईल. तुम्हास सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, 1982 व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अशंराशीकरण) नियम, 1984 आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु होणार नाही.

- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.(17/2000)/बारा. दिनांक 28 मार्च, 2005 अन्वये, लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन (लहान कुटूंब म्हणजे दोन मुले यांसह पत्नी व पती) प्राप्त करुन घेण्यात आले आहे. त्यामुळे कुटुंब मर्यादा दोन अपत्याचेवर सेवा कालावधीमध्ये वाढणार नाही याची दक्षता घ्यावी. कुटुंब मर्यादेत वाढ झाल्यास कोणत्याही प्रकारच्या शासकीय सवलतीस पात्र रहाणार नाही व ती शासकीय सेवेसाठी अनर्हता ठरेल.

- पोलीस प्रशिक्षण विदयालयात घेतली जाणारी परिक्षा तुम्ही चार संधीमध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तुम्ही चार संधीमध्ये परिक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्वरीत प्रभावाने तुमची सेवा समाप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदरच्या प्रशिक्षण कालावधीत अनाधिकृतपणे गैरहजर राहणे, अंतिम परिक्षेत असभ्य वर्तन, गैरशिस्त किंवा कॉपी करणे वगैरे कृत्य केल्याचे निदर्शनास आल्यास अथवा तसे सिध्द झाल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

- प्रशिक्षण केंद्र येथील मुलभूत प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर तुम्हांस सोलापूर ग्रामीण पोलीस दलाच्या आस्थापनेवरील कोणत्याही ठिकाणी वा पोलीस मुख्यालय मोटार परिवहन विभाग येथे कर्तव्यास नियुक्त करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. पोलीस कर्मचारी या नात्याने पोलीस दलामध्ये नियुक्त झाल्यानंतर तुम्हांवर सोपवलेली सर्व प्रकारची कर्तव्य बजाविणे तुमचेवर बंधनकारक राहिल.

3. पोलीस दलाच्या सेवेच्या अनुषंगाने योग्यता व पात्रता तपासण्यासाठी पोलीस प्रशिक्षण विद्यालयामध्ये मानसिक चाचणी (Psychological Test) घेण्यात येईल. सदर चाचणीत तुम्ही अपात्र ठरल्यास तुमची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी. पोलीस शिपाई या पदावर नियुक्ती केलेल्या उमेदवारांना मुंबई पोलीस अधिनियम 1951, मुंबई पोलीस (शिस्त व अपिल) नियम 1956 व राज्य शासनाने वेळोवेळी विहीत केलेले व करण्यात येणारे अन्य सर्व नियम लागू होतील.

4. वरील नमुद उमेदवारांनी पोलीस मुख्यालय, सोलापूर ग्रामीण येथे राखीव पोलीस निरिक्षक त्वरित रुजु व्हावे. प्रशिक्षणास येताना आवश्यक ते सिव्हील ड्रेस,पेटी,कुलूप,बादली,ताट,वाटी,तांब्या व विजेरी इ. साहित्य बरोबर आणावे. तसेच भोजन अग्रीम रु. 3000/- सोबत आणावा. प्रशिक्षणाच्या कालावधीत कोणत्याही प्रकारची रजा मिळणार नाही. पोलीस मुख्यालयाचा परिसर सोडून बाहेर जाता येणार नाही त्याच प्रमाणे कोणताही प्रशिक्षणार्थी उमेदवार स्वत: जवळ भ्रमणध्वनी,रेडीओ, टेप रेकॉर्ड बाळगणार नाही तसेच प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षण केंद्रावर सोबत ठेवणार नाही.

5. उमेदवारांनी प्रशिक्षण कालावधीत त्यांची शिस्त ही अत्यंत उच्च दर्जाची राहील याची दक्षता घ्यावी. वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन कसोशीने होईल याची दक्षता बाळगावी. सदर प्रशिक्षण कालावधीत गैरशिस्तीचे वर्तन व असभ्य वागणुक आढळून आल्यास त्वरित सेवेतून कमी करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**( शिरीष सरदेशपांडे )**
**पोलीस अधीक्षक,सोलापुर ग्रामीण**

**प्रति,**

वरील संबंधित उमेदवार.

**प्रत** :- राखीव पोलीस निरीक्षक,पोलीस मुख्यालय,सोलापुर ग्रामीण.

2/- सदर आदेशाची मुळप्रत नमद उमेदवारास बजावुन त्यांची दुय्यम प्रतीवर स्वाक्षरी घ्यावी व दुय्यम प्रत या कार्यालयास त्वरीत सादर करावी.

**प्रत** :- राखीव पोलीस निरीक्षक,पोलीस मुख्यालय,सोलापुर ग्रामीण.(दोन प्रतिमध्ये )

2/- वरील उमेदवार हे कर्तव्यावर हजर झाल्याबाबतचा अहवाल दिनांकासह या कार्यालयास सादर करावा. सदरील उमेदवारांना योग्य तो सरकारी सरंजाम व साहित्य अदा करण्यात यावे. तसेच प्रत्येक उमेदवारांकडुन भोजन अग्रीम म्हणुन रु.3,000/- घेण्यात यावे.

**प्रत**:- प्रमुख लिपीक लेखा शाखा ( चार प्रतिसह) / जिपोप /आदेश फाईल / पशा-3